# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## विभाग : ग्रंथालय विभाग

Scanned with OKEN Scanner

जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव
साने गुरूजी ग्रंथालय व वाचनालय, जळगाव

दि २४/०४/२०२६

प्रति,
म.कार्यालय अधिक्षक सो.
प्रमुख कार्यालय
म.न.पा.जळगाव.

**विषय** - जळगाव शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत घेण्यात आलेले निर्णय मंजुर कामे आर्थिक व्यवहार व प्रशासकीय कारभाराबाबत सविस्तर श्वेत प्रत्रिका (white paper) प्रसिद्ध करण्याबाबत.

**संदर्भ** –१) जा.क्रं/ज.श.म.न.पा/प्रमुख का/ १८३/दि २०/०४/२०२६ आदेशाअन्वये.
२)सन्मा. नगरसेविका सौ. वैशाली अमित पाटील यांचा दिनांक ०४/०३/२०२६ चा अर्ज दिनांक २७/०३/२०२६.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय आदेशान्वये प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत श्वेत पत्रिका काढणे बाबत इकडील कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.
त्या अनुषंगाने जळगाव शहर महानगर पालिका संचालित साने गुरूजी ग्रंथालय व वाचनालय विभाग कडील केलेली कामे खालील प्रमाणे.

१) ग्रंथालया व वाचनालय विभागात दररोज वाचनार्थ येणारे नागरीक, विदयार्थी ,व वाचक, सभासद यांचे साठी दैनिक सप्ताहिक पाक्षिक मासिके दिवाळी अकं दरपत्रके मागवून वार्षिक पुरवठादार नेमणे व वाचन साहित्य उपलब्ध करूण देणे .
२) ग्रंथालयातील वर्गणीदार सभासद ,विदयार्थी यांचे साठी दरपत्रके मागवून ग्रंथालयाच्या अनुदान मधुन कथा कांदबरी गांष्टी स्पर्धा परीक्षाची पुस्तके इ . ग्रंथ खरेदी करणे.

| आ.क | कामाचे नाव | सन | प्रशासकीय आदेश | कार्यदेश क्रं | वार्षिक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाचनसाहित्य खरेदी (दैनिके मासिके साप्ताहिके पाक्षिके ) वार्षिक | २०२४-२५ | २ / १४/०३/२०२४ | जा.क्र./ग्रंथालय/०२ / दि १५/३/२०२४ | १,००,०००/- | - |
| २ | वाचनसाहित्य खरेदी (दैनिके मासिके साप्ताहिके पाक्षिके ) वार्षिक | २०२५-२६ | १ / १/०४/२०२५ | जा.क्र./ग्रंथालय/२५ / दि १/४/२०२५ | १,१०,०००/- | - |
| ३ | ग्रंथखरेदी | २०२४-२५ | २ / ३०/०३/२०२६ | जा.क्र./ग्रंथालय/१३० / दि ३०/३/२०२६ | १,१०,०००/- | - |

**वरील प्रमाणे माहीती सादर.**

(सही) २४/४/२६
ग्रंथपाल
सानेगुरुजी ग्रथालय वाचनालय
जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

Scanned with OKEN Scanner

# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**प्रशासकिय आदेश क्रः-** ०२          **दि.** १४/०३/२०२४

**वाचाः-**

१) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. भाखास-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३ उद्योग-४ मंत्रालय, मुंबई-३२ दि. ०१/१२/२०१६ तसेच शासन निर्णय क्रं. भांखस-२०२०-२१ / प्र.क्र.-८ / उद्योग-४ दि. ०७/०५/२०२१ अन्वये मधील समाविष्ट नियमपुस्तीकेच्या परिच्छेद ३.२.३ नुसार व मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (१) अन्वये दरपत्रक.

२) सन- २०२४-२५ चे महानगरपालिका अंदाजपत्रातील वाचनसाहित्य (वृत्तपत्रके, मासिके) या लेखाशिर्षाअंतर्गत एकुण रु. १,७५,०००/- तरतुद करण्यात आलेली आहे.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका संचालीत सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय व त्यांचे उपकेंद्राकरिता तसेच म.न.पा. अधिकारी पदाधिकारी यांचे प्रशासकिय कार्यालयांकरिता दैनिके, दैनंदिन वृत्तपत्रे, म.न.पा. विषयक आलेल्या बातम्या / निवेदने यांची दैनंदिन दैनिकातुन कात्रणेकरुन फायलिंग करणे इ. कामे सन-२०२३-२४ चे आर्थिक वर्षाकरिता लागणारे दैनंदिन वाचन साहित्य (दैनिके, स्थानिक बाहेरील, साप्तहिके , मासिके, पाक्षिके, त्रैमासिक, दिवाळी अंक इ.) इत्यादीं पुरवठा करणे बाबत..

**प्रस्तावना :-** जळगांव शहर महानगरपालिका संचालीत सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय व त्यांचे उपकेंद्राकरिता तसेच म.न.पा. अधिकारी पदाधिकारी यांचे प्रशासकिय कार्यालयांकरिता दैनिके,दैनंदिन वृत्तपत्रे, म.न.पा. विषयक आलेल्या बातम्या / निवेदने यांची दैनंदिन दैनिकातुन कात्रणेकरुन फायलिंग करणे इ. कामे सन-२०२४-२५ चे आर्थिक वर्षाकरिता लागणारे दैनंदिन वाचन साहित्य (दैनिके, स्थानिक बाहेरील, साप्तहिके , मासिके, पाक्षिके, त्रैमासिक, दिवाळी अंक इ.) इत्यादी खरेदी कामी महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं. भाखास- २०१४ / प्र.क्र.८२ / भाग-३ उद्योग-४ मंत्रालय, मुंबई-३२ दि. ०१/१२/२०१६ तसेच शासन निर्णय क्रं. भांखस-२०२०-२१ / प्र.क्र.-८ / उद्योग -४ दि. ०७/०५/२०२१ अन्वये मधील समाविष्ट नियमपुस्तीकेच्या परिच्छेद ३.२.३ नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (१) नुसार महानगरपालिका परिपत्रकाद्वारे इच्छुक पुरवठादार मागविणेस मा. अति आयुक्त यांनी दि. २२/२/५२०२४ रोजी मंजुरी प्रदान केल्यानुसार इच्छुक पुरवठादार यांचेकडुन मुदतीत दि. ०७/०३/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपावेतो ३ दरपत्रके प्राप्त झालेली आहे. तसेच मा. सहा. आयुक्त यांचे समक्ष मुदतीत उघडण्यात आलेली आहेत.त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | वाचन साहित्यांचा प्रकार | शिवसमर्थ न्युज पेपर एजन्सी, जळगांव | श्री रेणुका न्युज पेपर एजन्सी, जळगांव | जय गजानन न्युज पेपर एजन्सी, जळगांव |
|---|---|---|---|---|
| १. | दैनिक वृत्तपत्र | सुट नाही. | छापील किंमती प्रमाणे | छापील किंमती प्रमाणे |
| २. | मासिके | सुट नाही. | छापील किंमती प्रमाणे | छापील किंमती प्रमाणेछ |
| ३. | त्रेमासिके | सुट नाही. | छापील किंमती प्रमाणे | छापील किंमती प्रमाणे |
| ४. | साप्ताहिके | सुट नाही. | छापील किंमती प्रमाणे | छापील किंमती प्रमाणे |
| ५. | पाक्षिके | सुट नाही. | छापील किंमती प्रमाणे | छापील किंमती प्रमाणे |
| ६. | दिवाळी अंक | सुट नाही. | छापील किंमती प्रमाणे | सुट नाही. |
| | | सर्व प्रकारचे दैनिकाला १.०० पैसे सेवा शुल्क द्यावे लागेल. | सेवा शुल्क मागणी केलेली नाही. | प्रती दिवस प्रती नगास अंकासह ७५ पैसे द्यावे लागेल. |

वरील प्रमाणे आलेले दर पाहता **श्री रेणुका न्युज पेपर एजन्सी जळगांव** व इतर दोन पुरवठा दारानी दैनिके, वृत्तपत्रे, मासिक, त्रेमासिके , साप्ताहिक, पाक्षीके व दिवाळीअंका इ. यावर कोणत्याही प्रकारचे सुट दिलेली नाही. परंतू इतर पुरवठादारांनी अ.क्र. १.०० पैसे सर्व दैनिकाला तसेच ०.७५ पैसे प्रती नगास सेवाशुल्क द्यावे लागेल असे दरात दिलेले आहे. परंतु पुरवठादार यांना ते देणे योग्य नाही. तसेच पुरवठादार **श्री. रेणुका न्युज पेपर एजन्सी, जळगांव** कोणत्याही प्रकारचे सेवाशुल्काची मागणी केलेली नाही. तरी पुरवठा / एजन्सीधारक श्री रेणुका न्युज पेपर एजन्सी, जळगांव यांनी सदरचे वाचन साहित्य छापील किमती मध्ये पुरवठा करणेस सहमती दर्शविले नुसार त्यांचे दर स्विकृत करण्यास म. सहाय्यक आयुक्त सो यांनी दि. ११/०३/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.

## आदेश

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जळगांव शहर महानगरपालिका संचालीत सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय व त्यांचे उपकेंद्राकरिता तसेच म.न.पा. अधिकारी पदाधिकारी यांचे प्रशासकिय कार्यालयांकरिता दैनिके, दैनंदिन वृत्तपत्रे, इ. कामे सन-२०२४-२५ चे आर्थिक वर्षाकरिता लागणारे दैनंदिन वाचन साहित्य (दैनिके, स्थानिक बाहेरील, साप्तहिके, मासिके, पाक्षिके, त्रैमासिक, दिवाळी अंक इ.) इत्यादी पुरवठा करणेचे दर स्विकृत करण्यात येत असून त्यास येणाऱ्या खर्चास रु-१,००,०००/- मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रस्तावीत कामाचा खर्च वाचनसाहित्य (वृत्तपत्रके, मासिके) या लेखा शिर्षा करण्यात यावा.

14/3/24

(अभिजित बाविस्कर)
सहा. आयुक्त
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**प्रत माहितीसाठी सादर**
१)म.मुख्य लेखापरिक्षक, म.न.पा,जळगांव
२)म.मुख्य लेखाधिकारी, म.न.पा, जळगांव

Scanned with OKEN Scanner

# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

दि.०१-/०४-/२०२५

प्रशासकीय आदेश क्र. १-----

वाचा :-

१) महाराष्ट्र शासन उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र . भाखास २०१४/ प्र.क्र ८२/भाग-३ उद्योग-४ मंत्रालय,मुंबइ-३२, दि. ०१/१२/२०१६ तसेच शासन निर्णय क्र भाखास -२०२०-२१ / प्र.क्र ८/ उद्योग-४,दि.०७/०५/२०२१ अन्वये मधील समाविष्ट नियमपुस्तिकेच्या परिच्छेद ३.२.३ नुसार व महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलाम ५ (२) (१) अन्वये दरपत्रक

२) सन २०२५-२६ चे महानगरपालिका अंदाजीतपत्रातील वाचन साहित्य(वृत्तपत्रके,मासिके) या लेखाशिर्षाअंतर्गत एकूण रु.१,७५,०००/- तरतुद करण्यात आलेली आहे.

**विषय :-** सन २०२५-२६ चे महानगरपालिका संचालित साने गुरुजी ग्रंथालय व वाचनालय व त्याचे उपकेंद्रा करिता तसेच म.न.पा अधिकारी पदाधिकारी यांचे प्रशासकीय कार्यालया करिता दैनिके,दैनंदिन वृत्तपत्रे, म.न.पा विषयक आलेल्या बातम्या/निवेदने यांची, दैनीकांतून कात्रणे करून फायलिंग करणे वाचन साहित्य (दैनिके,स्थानिक बाहेरील, साप्ताहिके, मासिके,पक्षिके, त्रैमासिके, दिवाळी अंक - २०२५ इ.) इत्यादी पुरवठा करणे बाबत..

**प्रस्तावना :-** जळगांव शहर महानगरपालिका संचालित साने गुरुजी ग्रंथालय व वाचनालय व त्यांचे उपकेंद्राकरिता तसेच म.न.पा अधिकारी पदधिकारी यांचे प्रशासकीय कार्यालयाकरिता दैनिके,दैनंदिन वृत्तपत्रे, म.न.पा विषयक आलेल्या बातम्या/निवेदन यांची, दैनीकांतून कात्रणेकरून फायलिंग करणे इ.कामे सन-२०२५-२६ चे आर्थिक वर्षकरिता लागणारे दैनंदिन वाचन साहित्य (दैनिके,स्थानिक बाहेरील साप्ताहिके, पक्षिके,मासिके, त्रैमासिके, दिवाळी अंक २०२५) इत्यादी खरेदी कामी महाराष्ट्र शासन उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.भाखास २०१४/ प्र.क्र ८२/भाग-३ उद्योग-४ मंत्रालय,मुंबइ-३२ दि.०१/१२/२०१६ तसेच शासन निर्णय क्र भाखास -२०२०-२१ / प्र.क्र ८/ उद्योग-४ दि.०७/०५/२०२१ अन्वये मधील समाविष्ट नियमपुस्तिकेच्या परिच्छेद ३.२.३ नुसार व महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलाम ५(२)(१) नुसार महाराष्ट्र महानगरपालिका परिपत्रकद्वारे इच्छुक पुरवठादार मागविणेस मा.उपायुक्त यांनी दि.१९/३/२०२५ रोजी मंजूरी प्रदान केल्यानुसार इच्छुक पुरवठादार यांचे कडून मुदतीत दि.२६/३/२०२५रोजी दुपारी १२ :०० वाजे पावेतो ३ दरपत्रक प्राप्त झालेली आहे.तसेच मा.उपायुक्त यांचे समक्ष मुदतीत उघडण्यात आलेली आहे. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.न | पुरवठा करायचा तपशील | शिवसमर्थ न्यूज पेपर एजन्सीज जळगाव | रेणुका न्यूज पेपर एजन्सीज जळगाव | जय गजानन न्यूज पेपर एजन्सीज जळगाव |
|---|---|---|---|---|
| १<br>२<br>३<br>४ | दैनिके ( सर्व प्रकारची )<br>साप्ताहिके पक्षिके (सर्व प्रकारची )<br>मासिके व त्रैमासिके<br>दिवाळी अंक - २०२५ | १ स्थानिक दैनिके मराठी,हिन्दी,इग्रजी सूट नाही<br>२ बाहेरील देनिक सर्व प्रकारचे सूट नाही<br>३साप्ताहिके, ,पक्षिके, मासिके त्रैमसिके सूट नाही<br>४ दिवाळी अंक — २०२५ करिता सूट नाही<br>टीप — सर्व प्रकारचे दैनिके १.२५ प्रती अंकास सेवा शुल्क द्यावे लागेल | १ सर्व प्रकारचे दैनिके छापील किमती प्रमाणे<br>२ सर्व प्रकारचे मासिके छापील किमती प्रमाणे<br>३ सर्व प्रकारचे पक्षिके छापील किमती प्रमाणे<br>४ सर्व प्रकारचे त्रैमासिके छापील किमती प्रमाणे<br>५ सर्व प्रकारचे दिवाळी अंक छापील किमती प्रमाणे | १ सर्व प्रकारचे दैनिके मराठी,हिन्दी,इग्रजी छापील किमती प्रमाणे व सूट नाही<br>२ सर्व प्रकारचे मासिके,पक्षिके,साप्ताहिके छापील किमती वर सूट नाही<br>३ त्रैमासिके सर्व प्रकारचे छापील किमती वर सूट नाही<br>४ दिवाळी अंक — २०२५ चे छापील किमती वर सूट नाही तसेच प्रतेक प्रतीवर प्रती अंकास रु ३ रुपया सेवा शुल्क मिळावे |

Scanned with OKEN Scanner

वरील प्रमाणे आलेले दर पाहता **श्री रेणुका न्यूज पेपर एजन्सी जळगाव** व इतर दोन पुरवठा दारांनी दैनिके ,साप्ताहिके,मासिके,पक्षिके,दिवाळी अंक २०२५ इ. यावर कोणत्याही प्रकारचे सूट दिलेले नाही. परंतु पुरवठादार शिवसमर्थ न्यूज पेपर एजन्सी,जळगाव सर्व प्रकारचे दैनिके १.२५ पैसे प्रती अंकास सेवा शुल्क द्यावे लागेल व पुरवठादार जय गजानन न्यूज पेपर एजन्सी,जळगाव यांनी प्रत्येक प्रतीवर अंकास रु ३ प्रती सेवाशुल्क मिळणेबाबत नमुद केलेले असून म.न.पा चे आर्थिक हिताचे नसल्याने ते देता येणार नाही व त्यांचे कडून सदरचे वाचन साहित्य खरेदी करणे योग्य होणार नाही.

तसेच पुरवठादार **श्री रेणुका न्यूज पेपर एजन्सी जळगाव** यांनी सदरचे वाचन साहित्य छापील किमती मध्ये पुरवठा करणेस सहमती दर्शवलेली असून कोणत्याही प्रकारचे सेवा शुल्क आकारलेले नसल्याने त्यांनी दिलेल्या दरात वाचन साहित्य खरेदी पुरवठा करणेस सहमति दर्शविले नुसार त्याचे दर स्विकृत करण्यास म.उपायुक्त सो, यांनी दि २६/०३/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे

**आदेश**

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलाम ७३ ( ड ) नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारनुसार ,जळगाव शहर महानगरपालिका संचालित साने गुरुजी ग्रंथालय व वाचनालय व त्यांचे उपकेंद्राकरिता तसेच म.न.पा अधिकारी पदधिकारी यांचे प्रशासकीय कार्यालयाकरिता दैनिके,दैनंदिन वृत्तपत्रे, करणे इ.कामे सन-२०२५-२६ चे आर्थिक वर्षकरिता लागणारे दैनंदिन वाचन साहित्य साहित्य (दैनिके,स्थानिक बाहेरील,साप्ताहिके,मासिके,पक्षिके,त्रैमासिके,दिवाळी अंक २०२५) इत्यादी पुरवठा करणेस दर स्विकृत करण्यात येत असून त्यास येणारा खर्चास रु.१,१०,०००/- मान्यता देण्यात येत आहे तसे प्रस्तावित कामाचा खर्च वाचन साहित्य (वृत्तपत्रे ,मासिके) या लेखाशिर्षावर करण्यात यावा.

01/04/25

उपायुक्त

**जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव**

**प्रत माहितीसाठी सादर**

1. मा. मुख्यलेखा परिक्षक, म.न.पा,जळगाव
2. मा.मुख्यलेखा अधिकारी, म.न.पा,जळगाव.

Scanned with OKEN Scanner

जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय

प्रशासकिय आदेश क्र. २ — दि. ३०/३/२०२६

**वाचा** १. म. संचालक, ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य मंबई-२३ जा.क्र. ०४/२०२४-२५/२८७०दि.२५/०७/२०२४ अन्वये निश्चित केलेले सुट दरा अन्वये

२. सन २०२४-२५ जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव अंदाज पत्रकातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्याकडील परीरक्षण अनुदानातून.

**विषय** :- जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव संचलित सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय व त्यांचे उपकेंदाकरिता जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांचे कडील वितरित झालेले परीरक्षण अनुदानातून ग्रंथ व पुस्तके खरेदी करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u> :-

जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव संचलित सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय व त्यांचे उपकेंदाकरिता जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांचे कडील वितरित झालेले परीरक्षण अनुदानातून मा. संचालक सो, ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई-२३ जा.क्रं. ०४/२०२४-२५/२८७० दि.२५/०७/२०२४ अन्वये निश्चित केलेले सुट दरा अन्वये निश्चित केलेल्या सुट दरात इच्छुक पुरवठादारा कडून म.न.पा परिपत्रका अन्वये पुरवठादार यांचा /यांचे स्वतःचे लेटरहेड वर मा.उपायुक्त सो, यांचे दि.१०/२/२०२६ चे मंजूरी अन्वये दि. १६/२/२०२६ रोजी दुपारी ४:०० वाजेपावेतो दर पत्रक मागविण्यात आले. त्यानुसार इच्छुक तीन पुरवठादारांची दरपत्रके प्राप्त झालेली आहे. मा. उपायुक्त सो, यांच्या समक्ष सिलबंद दरपत्रक उघडण्यात आलेले आहे. त्यांचा तुलनात्मक तक्ता

| पुरवठा करायचा तपशिल | अभिषेक बुक सेंटर ५१७ ई वाडी करवीर भगिनी एस.टी.स्टॅण्ड जवळ, कोल्हापूर | विदया बुक एजन्सीज साई सुष्टी हाईटस शॉप नं ७ दिवा शिलरोड (पुव ) जि ठाणे | मानसी पुस्तकालय, ६३/३१/१, गजानन नगर, लेन नं.१, पिंगळे गुरव, पुणे-६१ |
|---|---|---|---|
| नविन दर्जेदार कथा कांदबरी चरित्रे/ग्रंथ आत्मचरित्र ऐतिहासिक पुस्तके अद्यावत स्पर्धा परीक्षा पुस्तके | आम्ही सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय करीता जळगाव महानगरपालिकेस नवीन दर्जेदार कथा कांदबरी चरित्रे/ग्रंथ आत्मचरित्र ऐतिहासिक पुस्तके अद्यावत स्पर्धा परीक्षा पुस्तके व इतर आवांतर विषयाची पुस्तके महाराष्ट्र शासन ग्रंथालय संचालनालय यांनी निश्चित केलेल्या २५ % सूट दरानुसार आहे. आम्ही आपणास ३०% सूट देऊन पुस्तक पुरवठा करण्यात आम्ही तयार आहोत त्याबाबत सदरचे संमती पत्र देण्यात येत आहे आम्ही जळगाव महानगरपालिकेत पुरवठा करण्यास तयार असुन त्यावर आपले महानगर पालिके कडुन आमचे अदायगीचे बिल मालाचा पुरवठा केल्यानंतर ३० दिवसात बिलाचे पेमेंट करावे लागेल. | जळगाव महानगर पालिका संचालित सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय करीता चरित्रे आत्मचरित्र स्पर्धा परीक्षा इतिहास कथा कादंबरया आदी विषयांची पुस्तके महाराष्ट्र शासन ग्रंथालय संचालनालय यांनी निश्चित केलेल्या दरानुसार म्हणजे २५% प्रमाणे आम्ही आपणास देऊ तरी आपनास आम्ही विनंती की आपल्या सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालयची ग्रंथ खरेदी आमच्या कडुन करावी व आपल्या सेवेची संधी दयावी | कथा कादंबऱ्या, अध्यात्मिक, ऐतिहासिक, आत्मचरित्र, स्पर्धा, मुलांसाठी गोष्टीची. शैक्षणिक आदी विषयांची पुस्तके उपलब्ध आहेत जळगाव महानगरपालिकेच्या सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय करीता पुस्तके आमच्याकडून खरेदी करून आपल्या सेवेची संधी आम्हास द्यावी हि विनंती आम्ही पुस्तकांच्या आम्ही छापील किंमतीवर २० % सुट देवू कृपया आमचा अर्जाचा विचार नक्की करावा |

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त दराचा तुलनात्मक तक्ता पहाता तनीही पुरवठादार यांनी ग्रंथ / पुस्तके इत्यादी या वाचन साहित्यावर छापींत किंमातीवर सूट दिलेली असून ग्रंथ / पुस्तके पुरवठा करणे बाबत संमती दर्शवलेली आहे. परंतु अनुक्रमे ग्रंथ् पुरवठा विदया बुक एजन्जी यांनी २५% प्रमाणे सूट देणार असल्याचे त्यांचे दर पत्रकात नमूद आहे तसेच मानसी पुस्तकालय यांनी पुस्तकाचा छापीत किंमतीवर २०% प्रमाणे सूट देणार असल्याचे दर पत्रकात नमूद केलेले आहे तसेच पुरवठादार अभिषेक बुक सेंटर, कोल्हापूर यांनी सादरचे ग्रंथ/पुस्तके या वाचन साहित्यावर महाराष्ट्र शासन ग्रंथालय संचालनालय यांनी ग्रंथ/पुस्तकेवर निश्चित केलेल्या २५% सुट दर नुसार आहे परंतु सदर पुरवठादार अभिषेक बुक सेंटर, कोल्हापूर हे ३०% सूट देऊन पुस्तके/ग्रंथ पुरवठा करणेस तयार असून तशी सहमती त्यांनी दर्शवलेली आहे. महानगरपालिकेकडून त्यांचे बिलाचे अदायगी मालाचा पुरवठा केल्यानंतर ३० दिवसाचा आत बिलाचे पेमेंट करावे लागेल अशी अटी-शर्तीसह नमूद करून दिलेले आहे.

तरी अभिषेक बुक सेंटर, कोल्हापूर यांनी त्यांचे दरपत्रकात सुटदरास विना अटी-शर्तीसह दर स्विकृत करणेस म. उपायुक्त सो, (सा.क) यांनी दि. ३०/३/२०२६ रोजी मान्यता दिलेली आहे.

**आदेश**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ड नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव संचलित सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय व त्यांचे उपकेंद्राकरिता ग्रंथ/पुस्तके इत्यादी पुरवठा करण्याचे सुट दर विना अटी व शर्तीचे स्विकृत करण्यात येत असून त्यास येणाऱ्या रु.१,१५,२००/- खर्चाच मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रस्तावित खर्च सन २०२४-२५ चे अर्थिक वर्षातील मंजूर अंदाजपत्रकातील सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालयाचे लेखाशिर्षकाखालील जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांचे कडील मंजूर परीक्षण अनुदानातून खर्च करण्यात यावा.

30.3

पंकज गोसावी
उपायुक्त सो, (सा.क)
जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

प्रत माहितीस्तव सादर
म.मुख्यलेखा परिक्षक मनपा जळगाव
म.मुख्यलेखा अधिकारी मनपा जळगाव

Scanned with OKEN Scanner

# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## विभाग : ग्रंथालय विभाग

Scanned with OKEN Scanner